**परिपत्रक क्र. ३४**

**रयत शिक्षण संस्था,सातारा**
**आस्था./माध्य./**
**दि. २०/०१/२०१२**

**सर्वश्री शाखाप्रमुख,**
**प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक,कनिष्ठ महाविद्यालये व अध्यापक विद्यालये**
**रयत शिक्षण संस्था,**

यांचेकडे

**विषय :- वरिष्ठ वेतनश्रेणी मिळलेल्या शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी तपासून त्रुटी कळविणेबाबत**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.चवेआ-१०८९/(१११) माशि-२, दि.२ सप्टेंबर १९८९
२. शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग क्र.चवेआ-१०९५/(४५२/९५) माशि-२ दि.८ डिसेंबर १९९५
३. शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग क्र.एसएसएन २६९६/५०७२७/(६०८/९६) माशि-२ दि. १ डिसेंबर १९९९
४. संस्थेकडील परिपत्रक क्र. १० दि. २१/०७/२०११

उपरोक्त विषय संदर्भात कळविण्यात येते की, वरील संदर्भ क्र. २ ने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेल्या शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी पहाणेसाठी दि. १५/०९/२०११ पर्यंत विभागीय कार्यालयात ठेवणेत आलेली होती.परंतु त्यानुसार योग्य ती माहिती कार्यालयास उपलब्ध झालेली नसलेने पुन्हा सुधारित यादी तयार करून दि.०१/०२/२०१२ ते दि.१५/०२/२०१२ या कालावधीत सर्व विभागीय कार्यालयात पहाणेसाठी ठेवली जाणार आहे.

तरी सर्व शाखाप्रमुखांनी स्वतः जातीने लक्ष घालून वरील कालावधीतमध्ये संबंधित यादीची पडताळणी आपले शाखेतील जे सेवक कार्यरत आहेत व आपल्या शाखेतून दि. ०१/०४/२००० नंतर आजअखेर सेवानिवृत्त झालेले आहेत, अगर निधन झालेले आहेत व ज्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी घेतली आहे. अशा सर्व सेवकांची रेकॉर्डबर हुकूम माहिती सोबत दिलेल्या नमुन्यानुसार तपासणी करून त्यामध्ये त्रुटी असल्यास व ज्यांची नावे यादीत नाहीत त्यांच्या माहितीचा अहवाल दि. २०/०२/२०१२ पर्यंत या कार्यालयाला मिळेल अशा रितीने पाठवावा. तसेच त्रुटी नसतील तर तसा निरंक अहवाल पाठवावा.

अहवाल पाठविताना संबंधित शिक्षकांच्या सर्व शैक्षणिक पात्रता (नेमणूकीच्या वेळच्या व नंतर प्राप्त केलेल्या) त्यांची उत्तीर्ण (तारीख,महिना व साल) तारखेसह नोंदी व ज्यांनी MS-ACIT कोर्स पूर्ण केला असल्यास त्याची नोंद करावी. त्याचबरोबर ज्या सेवकांना शिक्षा झालेली आहे किंवा ज्यांचे गोपनीय अहवाल असमाधानकारक आहेत तसेच ज्यांनी नियमित पदोन्नती नाकारलेली आहे. (उपमुख्याध्यापक/मुख्याध्यापक/उपप्राचार्य/प्राचार्य) या सर्व बार्बीचा उल्लेख शेरा कॉलममध्ये असणे आवश्यक आहे.

कनिष्ठ महाविद्यालये व अध्यापक विद्यालय यांचे सेवकांनी यापूर्वी यादी पाहिली नाही असे दिसून येते. तरी त्यांना कळविण्यात येते की, ज्या शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणी घेतलेली आहे. अशा सर्व सेवकांनी आपले नाव यादीमध्ये तपासून पहावे. अगर त्यामध्ये त्रुटी असल्यास सोबत दिलेल्या नमुन्यानुसार त्रुटी अहवाल २०/०२/२०१२ पर्यंत कार्यालयास मिळेल,अशा रितीने पाठवावा.

यादीची पडताळणी करताना सेवकांची वरिष्ठ वेतनश्रेणीची जी तारीख असेल त्यानुसार (वरिष्ठ वेतनश्रेणी रखान्यात असते त्यानुसार यादी पहात गेलेस त्या सेवकाचे नाव सापडते व वेळही वाचतो.)

संबंधीत यादीवरून वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेल्या शिक्षकांची निवडश्रेणी मंजूर करावयाची आहे. त्यामुळे चुकीच्या माहितीने कोणाचे काही नुकसान झालेस संबंधित शाखाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. शाखाप्रमुखांनी हे परिपत्रक शाखेतील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून ते वाचलेबद्दल त्यावर त्यांच्या सहया घ्याव्यात व त्या शाखेच्या दप्तरी जतन कराव्यात.

सदरचे परिपत्रक संस्थेच्या www.rayatshikshan.edu वेबसाईटवर पहाण्यासाठी उपलब्ध आहे.

कळावे

Dalage

**सहसचिव(माध्य.),**
**रयत शिक्षण संस्था,सातारा**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी---**

१. सर्व विभागीय अधिकारी,रयत शिक्षण संस्था,
२. ऑडिटर,रयत शिक्षण संस्था,सातारा

रयत शिक्षण संस्था, सातारा.

शाखेचे नाव :

## वरिष्ठ वेतनश्रेणीधारक शिक्षकांची माहिती

| अ.नं. | वरिष्ठ वेतनश्रेणीधारक शिक्षकाचे संपूर्ण नाव (प्रथम आडनाव) | नेमणूक तारीख १.४.७६ ते ३१.३.७८ अखेरची | शैक्षणिक अर्हता: पदवी/ पदव्युत्तर पदवी | शैक्षणिक अर्हता: मुख्य विषय | शैक्षणिक अर्हता: उत्तीर्ण तारीख | पूर्णवेळ शिक्षक म्हणून सलग नेमणूक | नेमणूकीच्या वेळची वेतनश्रेणी | प्रत्यक्षात वेतनश्रेणी मिळाल्याची तारीख | वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतनश्रेणी व मिळाल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | १.डीएड<br>२. बीएड<br>३.उच्च माध्यमिक | १. बीएड<br>२. उच्च माध्यमिक | |

| बढतीचा: हुद्दा | बढतीचा: तारीख | सध्याचा: हुद्दा | सध्याचा: वेतनश्रेणी | संबंधित शिक्षकाची सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १. उच्च माध्यमिक शिक्षक<br>२. उपमुख्याध्यापक<br>३. मुख्याध्यापक | | | | | |

वरील सर्व माहिती संबंधित शिक्षकाचे सेवा पुस्तकबर हुकूम भरली असून, ती बरोबर आहे.

जा.नं.

तारीख :

शाखाप्रमुख सही व शिक्का

टीप :- १. १.४.१९७६ पूर्वी पात्र परंतु अद्याप निवडश्रेणी मंजूर न झालेल्यांसाठी वेगळा फॉर्म भरावा.
२. डी.एड वेतनश्रेणी शिक्षकांसाठी वेगळा फॉर्म भरावा.
३. बी.एड वेतनश्रेणी शिक्षकांसाठी वेगळा फॉर्म भरावा.
४. उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी वेगळा फॉर्म भरावा.